पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा ■ वर्ष १ ■ अंक १० ■ गुरुवार, दि. ४ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# भूमि अभिलेख विभागातील गैरव्यवहाराचा पर्दाफाश

## निलंबित उपअधीक्षक पंकज पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

सिटी न्यूज सुपरफास्ट News IMPACT

प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** अकोला भूमी अभिलेख कार्यालयातील तत्कालीन आणि सध्या निलंबित असलेले उपअधीक्षक पंकज शिवदास पवार यांच्याविरुद्ध प्रशासकीय अधिकारांचा गैरवापर, फसवणूक आणि शासकीय दप्तरात मोठ्या प्रमाणावर फेरफार केल्याप्रकरणी अखेर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण, या सर्व प्रकरणात तोंडी आदेश देणारे आणि चौकशी समितीत सदस्य असणाऱ्यांना या सर्व प्रकरणात वगळण्यात आले आहे. इतकेच नाही तर ज्या विविध प्रकरणात विभागीय चौकशी सुरु आहे. त्याच प्रकरणात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणे हे कितपत न्यायोचित आहे असा ही प्रश्न विचारला जात आहे. या सर्व प्रकरणात तपास अधिकाऱ्यांना अद्याप चौकशी समितीचा पुर्ण अहवाल का दिला नाही अशी विचारणा होत आहे. त्याच बरोबर केवळ उपअधिक्षक पंकज पवार हेच कसे काय गुन्हेगार ठरले. लाभार्थ्यांच्या






बरोबर, विभागातील एजंट आणि विभागातील त्यांच्या कनिष्ठांनी जो अहवाल विविध प्रकरणात दिला त्यानंतर त्यांनी मान्यता दिली. इतकेच नाही तर केवळ उपअधिक्षक यांच्या मान्यतेने प्रकरण पुर्णत्वास गेले नाही काही प्रकरणात वरिष्ठांनी सरकारी पोर्टलवर से दिल्यानंतरच प्रकरणे मार्गी लागली असे असताना केवळ एकटा पंकज पवार याला दोषी ठरवित इतर आरोपींना वगळण्याचा उद्योग केला कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे. निलंबित उपअधिक्षक पंकज पवार यांच्या १ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कार्यकाळातील कामकाजाची सखोल चौकशी करण्यात आली होती. अमरावती प्रदेशचे भूमी अभिलेख उपसंचालक आणि पुणे जमाबंदी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या चौकशीचा अहवाल २ जानेवारी २०२६ रोजी सादर करण्यात आला होता. या अहवालात पवार यांनी पदाचा गैरवापर करून गंभीर गैरव्यवहार केल्याचे निष्पन्न झाले आहे.

या सर्व गंभीर बाबींचा विचार करून भूमी अभिलेख अमरावती उपसंचालकांच्या निर्देशानुसार, अकोल्याच्या जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख भारती खंडेलवाल यांनी सिटी कोतवाली पोलिसात तक्रार दिली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून, या रॅकेटमध्ये महसूल विभागातील आणखी काही अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

### चौकशीत समोर आलेले गंभीर गैरप्रकार

- पवार यांनी शासकीय सेवेत असताना शासनाचा विश्वासघात करून खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी अनेक बेकायदेशीर कृत्ये केल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात नेमके खाजगी व्यक्ती कोण त्यांचा तपशील मात्र जाहिर करण्यात आला नाही.
- तब्बल १५ प्रकरणांमध्ये मालमत्तेचे अधिकार, सत्ता प्रकार बदलणे आणि मयत खातेदारांच्या नावे नियमबाह्य पद्धतीने अर्ज मंजूर करणे. यातील संबंधित मालमत्ताधारक कोण, त्यांचे एजंट कोण, त्यांचे प्रकरणे कुठल्या ज्युनिअर आणि सिनिअरने मंजुर केले.
- ७ प्रकरणांमध्ये तात्पुरत्या भाडेपट्टयाच्या मिळकत पत्रिका तयार करणे, तसेच केवळ जागेची पाहणी करून नवीन मिळकत पत्रिका नियमबाह्यपणे बनवणे. यातील लाभार्थी कोण अशी विचारणा आता सुरु झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय कागदपत्र बनावट केल्याचा गुन्हा का दाखल नाही.
- खाजगी व्यक्तींच्या फायद्यासाठी मालमत्तेचे क्षेत्र वाढवणे, सार्वजनिक सुविधांच्या जागांवर खाजगी व्यक्तींची नावे नोंदवणे आणि जमिनींचे एकत्रिकरण (सामिलीकरण) करताना क्षेत्रफळ वाढवणे. हा उद्योग कोणासाठी केला आणि त्याच्या नावाचा उल्लेख का नाही अशी विचारणा केली जात आहे.
- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ चे उल्लंघन करून अधिकाराबाहेर जाऊन आदेश देणे आणि प्रमाणपत्रे वाटणे. असे करताना ज्या लाभार्थ्यांसाठी हा सरकारी दस्त बदलण्यात आला त्याच्या विरोधात गुन्हा दाखल होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.
- अकोला महानगरपालिकेकडे भूसंपादनाद्वारे हस्तांतरित झालेल्या शासकीय जागेवर खाजगी व्यक्तींची नावे बेकायदेशीरपणे चढवणे. हा खाजगी व्यक्ती कोण ज्याच्या नावावर शासकीय जागेचा भाग दिला गेला. त्यांच्या विरोधात गुन्हा का दाखल केला गेला नाही. अशी विचारणा होत आहे.

# कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सची लिज तर कधीची संपली

## ▶▶अकोला महापालिकेचा भोंगळ कारभार आला समोर ▶▶मनसे नेत्यांनी जमीन मोकळी करण्याची केली मागणी




प्रतिनिधी ४ जून

**अकोला:** कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सची लीज तर करारानंतर आठ वर्षात संपली आहे. तरी देखील महापालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्याकडे का लक्ष दिले नाही असा प्रश्न मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केला आहे. स्थानिक नागरिकांच्या हक्काची ओपन स्पेस त्यांना त्वरीत खुली करुन देण्याची मागणी मनसेने केली आहे.

कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्स ही ओपन स्पेस मध्ये बांधल्या गेली आहे. ओपन स्पेस मध्ये बांधकाम करताना महापालिकेसोबत झालेल्या करारानुसार केवळ दहा टक्के बांधकामाची परवानगी अपेक्षित आहे. पण, ग्रीन झोन ची जागा ताब्यात ठेवत दहा टक्के पेक्षा अधिकचे बांधकाम स्कुल ऑफ स्कॉलर्सने केल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे. ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली न ठेवता ती कपाउंडवॉल घेत बंदिस्त केल्या गेली. इतकेच नाही तर शाळेचे चौकीदार स्थानिकांना हाकलून लावत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. स्कुल ऑफ स्कॉलर्स ने ओपन स्पेस त्वरीत स्थानिकांसाठी खुली करावी अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी केली आहे.

दरम्यान, या विषयावर महापालिकेच्या नगर रचनाकार साबळे यांनी देखील कौलखेड येथील स्कुल ऑफ स्कॉलर्सच्या जागेविषयी असा धक्कादायक खुलासा केला आहे. त्यांनी देखील या विषयी माहिती देताना केवळ आठ वर्ष काही महिन्यांसाठी ही जागा लिजवर दिली होती. त्यानंतर नाही. त्यामुळे महापालिकेच्या कुठले अधिकारी या फाईलवर बसले होते. त्यांनी स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांसाठी खुली का केली नाही अशी विचारणा आता सुरु झाली आहे. तर महापालिकेने नुकत्याच घेतलेल्या ठरावानुसार स्कुल ऑफ स्कॉलर्सची ओपन स्पेस स्थानिकांना सत्तारुढ भाजप मिळवून देईल काय अशी विचारणा होत आहे. दरम्यान, स्कुल ऑफ स्कॉलर्स व्यवस्थापन, मुख्याध्यापक यांच्याशी आम्ही संपर्क केला असता तो झाला नाही. तर त्यांच्या चौकीदाराने आमच्या प्रतिनिधींनी आत सोडलेच नाही.

### कौलखेड स्कूल ऑफ स्कॉलर्सचा भाडेपट्टा संपला

▶▶मौजा कौलखेड मंजूर अभिन्यासात खुली जागा २३४१ स्वे.मी होती. त्यापैकी खुल्या जागेपैकी १-टक्के जागा म्हणजे २४३ स्वे.मी ही जागा स्वर्गीय राधिकाबाई मेघे महिला शिक्षण संस्था तर्फे सचिव श्रीमती सुमिती राजेंद्र वानखडे यांना दिनांक २३ फेब्रुवारी २००६ रोजी ८ वर्ष ११ महिन्याच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने दिली होती. त्यानंतरची जी काही कारवाई करायची होती, एकतर भाडेपट्टा वाढवण्याच्या संदर्भात किंवा खाली करण्यासंदर्भात, त्या संदर्भातली कारवाई महापालिकेकडून प्रलंबित आहे. सदर कारवाई महापालिकेतर्फे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जागा ही कोणत्या परिस्थितीत संबंधितांना भाडेपट्ट्यावर दिलेली आहे, याचं सखोल प्रत्यक्षरीत्या स्थळ पाहणी करून, नेमकं भाडेपट्ट्यावर देण्यात आल्यानंतर किती बांधकाम जास्त केलं, किती कालावधी जास्त हे केला आणि कोणत्या वापरासाठी त्यांनी व्हायलेशन केलं, याबाबीची सविस्तर तपासणी करून पुढील कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

**साबळे नगर रचनाकार,** महापालिका अकोला.

### स्कूल ऑफ स्कॉलर्स खाली करु



▶▶कौलखेड येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स एखाद्या खुल्या जागेवर १० टक्के पेक्षा जास्त बांधकाम केले गेले असेल, तर ती जागा सध्याच्या कब्जेदारकाकडून परत ताब्यात घेतली जाईल व पाडण्यात येईल. ताब्यात ओपन स्पेस देखभाल आणि दुरुस्तीसाठी त्याच परिसरातील स्थानिक नागरिकांच्या स्वाधीन केली जाईल. खुल्या जागांवर ज्यांनी बेकायदेशीरपणे ताबा मिळवला आहे, त्यांच्यावर कडक कारवाई करून त्या जागा खाली करून घेतल्या जातील.

**विजय अग्रवाल**
सभापती, स्थायी समिती मनपा, अकोला.

# मराठा आरक्षण : शासकीय यंत्रणा लागली कामाला, हेल्पलाइन नंबरही जारी

प्रतिनिधी ४ जून

**मुंबई :** मराठा आरक्षणासंदर्भात विशेष कक्ष स्थापन करण्यात येणार असून, आरक्षणासंदर्भातील नोंदी शोधणे, कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आदीबाबत नागरिकांना साह्य करण्यासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात येणार आहे. प्रमाणपत्रासंदर्भात अडचणी दूर करण्यासाठी मंत्रालयातील कार्यालयात ९३२६५६२८१५ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला असून, कार्यालयीन वेळेत या क्रमांकावर संपर्क साधता येईल, अशी माहिती मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

मराठा आरक्षण उपसमितीची बैठक मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात नुकतीच झाली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई आदी उपस्थित होते. 'मराठा आरक्षणाच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या आश्वासनांची निर्धारित वेळेत पूर्तता करण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय स्तरावर समन्वयाने कार्यवाही सुरू करावी. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत संवेदनशीलतेने निर्णय होण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांनी गांभिर्याने काम करावे. शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, शिंदे समितीच्या स्थापनेनंतर १३ लाख दाखल्यांचे झालेले वितरण; तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी कुणबी प्रमाणपत्राचे झालेले वाटप याची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर तातडीने संकलित करावी.

# खान सरांच्या कोचिंग क्लासवर गोळीबार

**पटना :** बिहारची राजधानी पटना येथील मुसल्लहपूर हाट परिसरात प्रसिद्ध शिक्षक आणि युट्यूबर खान सर यांच्या कोचिंग संस्थेबाहेर मंगळवारी रात्री गोळीबाराची घटना घडली. या घटनेत एका सुरक्षा रक्षकाला दुखापत झाली असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, कोचिंग संस्थेजवळ काही अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केला. काही वृत्तांमध्ये पाच ते दहा राऊंड फायरिंग झाल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच कोचिंग संस्थेच्या परिसरात तोडफोड झाल्याच्याही बातम्या समोर आल्या आहेत. घटनेनंतर खान सर यांनी माध्यमांशी बोलताना आपण घटनास्थळी उपस्थित असल्याचा दावा केला. त्यांनी सांगितले की, गोळीबाराच्या वेळी त्यांनी स्वतः अनेक राऊंड फायरिंग होताना पाहिली.

# मान्सून केरळमध्ये दाखल!

वृत्तसंस्था ४ जून

**तिरूअनंतपुरम :** केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली. पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, विदर्भातील मान्सूनसाठी १५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते.

पुढील २-३ दिवसात मोसमी वारे महाराष्ट्रातील काही भाग व्यापू शकतात, अशी भारतीय हवामान विभागाची माहिती आहे. पुढील २-३ दिवसांत गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगालचा उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती आहे. मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो, मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला आहे. याचदरम्यान, हवामान विभागाचे तज्ज्ञ प्रवीण कुमार यांनी महत्वाची माहिती दिली आहे. केरळमध्ये मान्सून धडकला असून यंदा तीन दिवस उशिराने आला आहे.

### पुढील ४८ तासांत कोकणात पाऊस

विदर्भात तापमान ४० ते ४२ अंशाचा घरात राहील. १० जून नंतर तापमान कमी होईल. केरळला सामान्यतः एक जूनच्या सुमारास दाखल होतो. आता तीन दिवस उशिरा केरळमध्ये दाखल झाला आहे. पुढील ४८ तासांत दक्षिण महाराष्ट्र त्यामध्ये कोकण मधला भाग तिथे पावसाचा अंदाज आहे, असं प्रवीण कुमार यांनी सांगितले.

### विदर्भात वादळीवाऱ्याचा मध्यम स्वरूपाचा पाऊस

मान्सूनच्या अनुषंगाने परिस्थिती अनुकूल आहे. विदर्भात साधारणतः १५ जूनच्या सुमारास मान्सून दाखल होतो. विदर्भात पुढील काही दिवस वादळीवाऱ्याचा मध्यमस्वरूपाचा पाऊस होईल. मात्र आता येणारा पाऊस हा अवकाळीच असेल, कारण मान्सूनच्या अनुषंगाने अजून विदर्भात अनुकुल वातावरण निर्माण व्हायचे आहे.

# जनगमतदार याद्या अचूक आणि दोषमुक्त करण्यासाठी महाराष्ट्रात 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहीम

प्रतिनिधी ४ जून

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाने भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करून देशभरातील मतदार याद्यांचे 'विशेष सखोल पुनरीक्षण' (Special Intensive Revision - SIR) करण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्राचा समावेश करण्यात आला असून राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख मतदारांच्या नोंदींची सखोल पडताळणी केली जाणार आहे.

निवडणूक आयोगाने यापूर्वी १९५२-५६, १९५७, १९६१, १९६५-६६, १९८३-८४, १९८७-८९, १९९२-९५ आणि २००२-०४ या कालावधीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमा राबवल्या होत्या. गेल्या २० वर्षांत केवळ विशेष संक्षिप्त पुनरीक्षण झाले असून, मोठ्या प्रमाणावर झालेले स्थलांतर, दुबार नावे आणि मतदार यादीतील बदल लक्षात घेता ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

संविधानाच्या कलम ३२६ नुसार मतदार म्हणून नोंदणीसाठी संबंधित व्यक्ती भारतीय नागरिक असणे आणि वयाची १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. मतदार यादीतील नोंदींची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची ठरणार आहे.

मोहिमेचे वेळापत्रक २० ते २९ जून २०२६ : गणना अर्जांची छपाई व प्रशिक्षण, ३० जून ते २९ जुलै २०२६ : घरभेटीद्वारे गणना अर्जांचे वितरण व संकलन, ५ ऑगस्ट २०२६ : प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दावे व हरकती स्वीकारणे, ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकतींचा निपटारा, ७ ऑक्टोबर २०२६ : अंतिम मतदार यादी प्रसिद्ध, ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन मतदारांना पूर्वभरलेले गणना पत्र वितरित करतील. या पत्रात मतदाराची सध्याची माहिती तसेच २००२-०४ मधील विशेष सखोल पुनरीक्षणातील माहिती उपलब्ध असेल. मतदारांना आवश्यक दुरुस्त्या करून नवीन छायाचित्र देखील सादर करता येणार आहे.

मतदारांना स्वतःची किंवा आई-वडील/आजी-आजोबा यांची २००२-०४ कालावधीतील मतदार यादीतील माहिती भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरून सहज मिळवता येणार आहे.

ही माहिती जतन करून BLO च्या गृहभेटीदरम्यान उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गृहभेटी दरम्यान घर बंद आढळल्यास किमान तीन वेळा भेट देणार आहेत. तसेच मतदारांना गणना पत्र ऑनलाईन पद्धतीनेही भरता येणार आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या मतदारांच्या नोंदींची जुळवणी होणार नाही किंवा त्रुटी आढळतील त्यांना नोटिसा देण्यात येणार असून संबंधित यादी स्थानिक स्वराज्य संस्था, तहसील कार्यालय तसेच जिल्हा व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध केली जाईल.

# घरकुल लाभार्थ्यांनी ९ जूनपर्यंत मोफत रेतीचा लाभ घ्यावा - तहसीलदार दिवटे

**सिंदखेडराजा :** प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर घरकुल योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी लागणारी रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येत असून, या सुविधेचा लाभलाभार्थ्यांनी ९ जूनपर्यंत घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे.

घरकुल लाभार्थ्यांना वेळेत रेती उपलब्ध व्हावी यासाठी तहसील कार्यालयात विशेष कक्ष सुरू करण्यात आला आहे. या कक्षामार्फत रेती वितरणाबाबत माहिती, प्रक्रिया आणि इतर आवश्यक मदत दिली जात आहे. रेती वितरणासंदर्भात अधिक माहितीसाठी व लाभासाठी लाभार्थ्यांनी संबंधित मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच तहसील कार्यालयातील विशेष कक्षात विक्की जगताप, प्रदीप मोरे, महंमद चौधरी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# ४.६५ लाखांचे कांदा बियाणे लंपास

**बुलडाणा :** पिंपळनेर येथील सिंदखेडराजा रोडवरील जुब्बूजी बायोमास ब्रिक्रेट इंडस्ट्री कंपनीमधून ४ लाख ६५ हजार ५०० रुपयांचे कांदा बियाणे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मोहम्मद अझहर मोहम्मद कलंदर (वय ३६, रा. महात्मा फुले रोड, ६ क्विंटल ६५ किलो वजनाचा माल समाविष्ट आहे. भाजीमंडी, देऊळगाव राजा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला. फिर्यादी हे सिड्स कंपनीशी संबंधित असून, प्रोसेसिंगसाठी आणण्यात आलेले अथर्व सिड्स कंपनीचे कांदा बियाणे जुब्बूजी बायोमास ब्रिक्रेट इंडस्ट्री परिसरात ठेवण्यात आले होते. २४ मे २०२६ रोजी रात्री ११.३८ ते २५ मे रोजी पहाटे ४ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी कंपनी परिसरातून एकूण १४ बॅग कांदा बियाणे चोरून नेल्याचे समोर आले.

CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

गुरुवार, दि. ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पेरणीपूर्वी पावसाच्या अंदाजावर शेतीचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक!



खरीप शेती म्हणजे केवळ बियाणे पेरणे नव्हे, तर शहाणपणाची पावले उचलणे, वेळेवर निर्णय घेणे जे आपल्याला अनिश्चिततेपासून वाचवतात. पावसाचा मागोवा घेण्यापासून ते योग्य वाण निवडण्यापर्यंत, मातीची काळजी घेण्यापासून ते विम्याद्वारे पिकांचे संरक्षण करण्यापर्यंत, प्रत्येक पायरी आपल्यासाठी महत्वाची आहे. आजचा शेतकरी मात्र केवळ शेतकरी नाही, तर जोखीम व्यवस्थापकही आहे. बदलते हवामान, बाजारातील बदलती मागणी आणि वाढता खर्च यामुळे केवळ पारंपरिक पद्धती पुरेशा राहिलेल्या नाहीत. येथेच तयारी, नावीन्य आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना अंमलात येतात.आत्मविश्वासाने नियोजन करून आणि योग्य उपायांनी पिकांचे संरक्षण करून आपल्या खरीप शेती हंगामावर नियंत्रण ठेवा. कारण जेव्हा तुम्ही चांगली तयारी करता तेव्हा तुमची वाढ चांगली होते आणि तोच सोयीस्कर, पर्यावरणपूरक शेतीचा आधार असतो. खरीप हंगाम (जून ते ऑक्टोबर) हा भारतातील मुख्य शेती हंगाम आहे. या काळात चांगल्या उत्पादनासाठी योग्य जमिनीची मशागत, बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, खतांचे योग्य व्यवस्थापन आणि पावसाच्या अंदाजावर आधारित पीक नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

**१. पूर्व मशागत आणि जमीन तयार करणे**

पावसाळ्यापूर्वी शेताची खोल नांगरणी करून घ्यावी, शेतातील कचरा, धसकटे वेचून शेत स्वच्छ करावे, शेवटच्या पाळीपूर्वी १० ते १२ गाड्या चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे, भारी जमिनीत पाण्याचा निचरा होण्यासाठी रुंद वरंबा आणि सरी पद्धतीचा वापर करावा.

**२. बियाण्यांची निवड आणि बीजप्रक्रिया**

पेरणीपूर्वी आपल्या जमिनीनुसार आणि कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या संकरित किंवा सुधारित वाणांचीच निवड करावी, बियाण्यांची उगवणक्षमता तपासून घ्यावी, पेरणीपूर्वी बियाण्यांना 'बीजप्रक्रिया' करणे आवश्यक आहे. यामुळे बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव सुरुवातीलाच रोखता येतो. यासाठी ट्रायकोडर्मा, कार्बेन्डाझिम किंवा रायझोबियमचा वापर करावा.

**३. पेरणी कधी करावी-**

मॉन्सूनचे आगमन झाल्यानंतर जमिनीत ८० ते १०० मिमी पाऊस पडल्यामुळे वापसा (पेरणीयोग्य ओलावा) आल्यावरच पेरणी करावी. घाईघाईने कोरड्या जमिनीत किंवा कमी पावसात पेरणी करू नये. साधारणपणे जूनचा दुसरा आठवडा ते जुलैचा पहिला आठवडा हा पेरणीसाठी सर्वात योग्य कालावधी मानला जातो.

**४. खतांचे व्यवस्थापन-**

माती परीक्षण अहवालानुसारच रासायनिक खतांचा वापर करावा. पेरणीच्या वेळी संपूर्ण स्फुरद आणि पालाश द्यावे आणि नत्रचा पहिला हप्ता द्यावा. खते बियाण्यांच्या खाली २-३ सेमी अंतरावर पडतील, अशी पेरणी यंत्राची रचना असावी.

**५. तण नियंत्रण-**

पिकाच्या सुरुवातीच्या ३० ते ४५ दिवसांत शेत तणमुक्त ठेवणे महत्त्वाचे असते. यासाठी वेळेवर खुरपणी करावी किंवा आंतरमशागतीची कामे (डवरणी/कोळपणी) करावीत. तणनाशकांचा वापर करताना कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त

दोन शतकांपासून वापरात असलेल्या सायकलचे वेगळेपण, दीर्घायुष्य आणि बहुउपयोगिता, तसेच ते वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, विश्वासार्ह, स्वच्छ, पर्यावरणास अनुकूल आणि टिकाऊ साधन असून ते पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यास प्रोत्साहन देते, हे मान्य करून आमसभेने ३ जून हा जागतिक सायकल दिन म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संबंधित घटकांना शाश्वत विकासाला चालना देणे, मुलामुलींसाठी शारीरिक शिक्षणासह शिक्षण अधिक मजबूत करणे, आरोग्याला प्रोत्साहन देणे, आजारांना प्रतिबंध करणे, सहिष्णुता, परस्पर सामंजस्य आणि आदर यांना प्रोत्साहन देणे, तसेच सामाजिक समावेशन आणि शांततेच्या संस्कृतीला चालना देणे यांसारख्या बाबींसाठी सायकलच्या वापरावर भर देण्यास आणि त्याला पुढे नेण्यास प्रोत्साहित केले गेले.



दरवर्षी ३ जून रोजी 'जागतिक सायकल दिन' साजरा केला जातो?सायकलचा वापर वाढावा, त्याद्वारे लोकांचे आरोग्य चांगले राहावे आणि पर्यावरणाचे रक्षण व्हावे, या उद्देशाने संयुक्त राष्ट्राने २०१८ मध्ये या दिनी अधिकृत घोषणा केली. सायकलचे मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी काय फायदे आहेत.

दुचाकी सायकल ही वापरण्यास आणि विकत घेण्यास सोपी आणि स्वस्त असा वाहन पर्याय आहे. त्यामुळे सर्वांना सामावून घेणारे जागतिक स्तरावरील वाहन म्हणून सायकल कडे पाहणे याबद्दल हा दिवस साजरा करण्याचे ठरविले गेले. समाजतील कोणत्याही स्तरातील व्यक्तींना सायकल चालविण्याचा आनंद घेता यावा यासाठी या दिवशी विशेष सायकल यात्रा आयोजित केल्या जातात. सायकल हे वाहन सहिष्णुता, मानवता यांचे प्रतीक आहे असा संदेश यातून पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त आहे, असा संदेश यानिमित्ताने दिला जातो. २०१५ साली लेझेक सिबिस्की या समाजिक शास्त्र विषयाच्या प्राध्यापकांनी सर्वांसाठी सायकल याविषयी लेख लिहिला. त्यानंतर जाणीव जागृती होऊन सायकल विषयासाठी विशेष दिवस राखून ठेवणे याला महत्व मिळाले. सायकल हे निर्धुर बाहन असल्याने त्यामुळे हवेचे प्रदूषण होत नाही. जागतिक स्तरावरील पर्यावरण प्रश्न वाढता असल्याने सायकल चालवून हवेहे प्रदूषण कमी करण्याचा जागतिक पातळीवरील महत्वाचा संदेश या दिवशी दिला जातो

मध्यम तीव्रतेच्या नियमित शारीरिक हालचालींचे – जसे की चालणे, सायकल चालवणे किंवा खेळ खेळणे – आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण फायदे आहेत. सर्व वयोगटांमध्ये, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याचे फायदे हे अपघातांसारख्या संभाव्य धोक्यांपेक्षा जास्त असतात. काहीच शारीरिक हालचाल न करण्यापेक्षा थोडीफार हालचाल करणे चांगले. दिवसभरात तुलनेने सोप्या मार्गांनी अधिक सक्रिय राहून, लोक शिफारस केलेली सक्रियतेची पातळी अगदी सहजपणे गाठू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, चालण्यासाठी आणि सायकलिंगसाठी सुरक्षित पायाभूत सुविधा निर्माण करणे हा देखील अधिक आरोग्य समानता साधण्याचा एक मार्ग आहे. सर्वात गरीब शहरी घटकांसाठी, ज्यांना अनेकदा खाजगी वाहने परवडत नाहीत, चालणे आणि सायकलिंग हे वाहतुकीचे एक साधन ठरू शकते, ज्यामुळे हृदयविकार, पक्षाघात, काही प्रकारचे कर्करोग, मधुमेह आणि मृत्यूचा धोकाही कमी होतो. त्यानुसार, सुधारित सक्रिय वाहतूक केवळ आरोग्यदायीच नाही, तर ती न्याय्य आणि किफायतशीर देखील आहे. पायी चालणाऱ्या आणि सायकल चालवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करणे, हे शहरांना लोकसंख्या वाढीपासून होणारे उत्सर्जन वेगळे करण्यास, तसेच हवेची गुणवत्ता आणि रस्त्यांवरील सुरक्षितता सुधारण्यास मदत करणाऱ्या गतिशीलता उपायांचा एक महत्त्वाचा भाग आहे. कोविड-१९ महामारीमुळे अनेक शहरांना त्यांच्या वाहतूक प्रणालींचा पुनर्विचार करण्यासही भाग पडले आहे.

जागतिक सायकल दिन सायकल वापरण्याच्या फायद्यांकडे लक्ष वेधतो, जे वाहतुकीचे एक साधे, परवडणारे, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल असे शाश्वत साधन आहे. सायकलमुळे हवा अधिक स्वच्छ राहते, वाहतूक कोंडी कमी होते आणि शिक्षण, आरोग्यसेवा व इतर सामाजिक सेवा सर्वात असुरक्षित लोकसंख्येसाठी अधिक सुलभ होतात. आर्थिक वाढीस चालना देणारी, असमानता कमी करणारी आणि हवामान बदलाच्या विरोधातील लढ्याला बळ देणारी एक शाश्वत वाहतूक व्यवस्था, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

१५ मार्च २०२२ रोजी, आमसभेने शाश्वत विकासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये सायकलिंगला मुख्य प्रवाहात आणण्यासंबंधीचा ठराव संमत केला . यामध्ये यावर भर देण्यात आला की, सायकल हे शाश्वत वाहतुकीचे एक साधन असून ते शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी एक सकारात्मक संदेश देते, तसेच हवामानावरही त्याचा सकारात्मक परिणाम होतो.

# नगराध्यक्ष केंदळे अनिल, शहरातील समस्या करताहेत नील !



अभियंता श्री.अनिल केंदले यांनी नगराध्यक्ष पदाची सूत्रे घेऊन आज जवळ जवळ १५० दिवस पूर्ण झालेत. १५० दिवसात एखादा राजकारणात नवखा असलेला माणूस काय करेल ? त्यातही एखादा सज्जन, सहृदयी माणूस असेल तर कठीणच ! त्यात हे क्षेत्र म्हणजे ' येथे समस्त दुर्जन असतात लोकं ' अशी राजकारणाची ख्याती.

त्यामुळे सहाजिकच ' एक अकेला अनिल केंदले क्या करेगा ? अशी सर्वसामान्यांची प्रतिक्रिया होती.

पण एक शिकलेला,अभियंती वृत्ती असलेला माणूस ' योजकः तत्र दुर्लभः ' ठरला.नियोजनबद्ध ,पारदर्शी आणी शिस्तबद्ध कारभारी असला तर काय करू शकतो हे आपल्याला १५० दिवसात दिसले.कुठलाही आततायीपणा नाही,आगाऊ मोठमोठ्या गप्पा नाहीत ,प्रसिद्धीचा हव्यास नाही , बडेजाव तर अजिबात नाही.सर्व अगदी शांतपणे,नियोजनानुसार ,ठाम भूमिका घेऊन लोकहिताची कामे श्री.अनिलभाऊ केंदले करतांना दिसताहेत. खर सांगू ! भाजपा उबाठा एकत्रित येण्याला माझा विरोध होता तो आजही आहे.सभागृहात विरोधी पक्ष हवाच यावर मी आजही ठाम आहे.गावाच्या दृष्टीने ते हितावह असते. शिवाय सर्व एकत्र आले तर ते केंदले साहेबांसारख्या संवेदनशील माणसाला गुंडाळून टाकतील असे माझे मत होते.

पण १५० दिवसाचा कार्यभार पाहता तसे होतांना दिसत दिसत नाही.सर्व नगरसेवक त्यांना शिस्तीत सहकार्य करतांना दिसत आहेत.आजवरच्या इतिहासात जितके सक्रिय नसतील तितके नगरसेवक प्रभागात सक्रिय होतांना दिसत आहेत.न.प.चे अधिकारी कर्मचारी देखिल बऱ्यापैकी कार्यतत्पर झालेले दिसत आहेत.

**एक अकेला अनिल केंदळे क्या कर सकेगा ?**

१) एक अनिल केंदले भर उन्हाळयात पाण्याचे नियोजन करून पाणी टंचाईचे संकट घालवू शकतो.
२) एक अनिल केंदले अनेक वर्षापासून रखडलेले रस्ते चकाचक करण्याचा जीवतोड प्रयास करतो.
३) एक अनिल केंदले प्रतिक्षेत असलेले नाट्यगृह सुसज्ज करू शकतो.
४) अंधारातले वाशिम बऱ्यापैकी प्रकाशमय करू शकतो.
५) अस्वच्छ वाशिमला स्वच्छतेकडे नेवू शकतो.
६) कचरा व्यवस्थापनावर जातीने लक्ष घालतोय.
७) बारा पंधरा तास फक्त वाशिमसाठी देतोय.
८)ज्ञानशक्ती,ईच्छाशक्ती आणी क्रियाशक्तीचा वापर करून वाशिमला सर्वांगसुंदर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतोय.

नगराध्यक्ष म्हणून खरे उतरण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.सगळे एकदम होणार नसले तरी प्रयत्न अचूक आणी प्रामाणिक आहेत.जे जे आम्हाला अपेक्षित आहे ते ते करण्याचा त्यांचा प्रयास कौतुकास्पद आहे.

छोटी अपेक्षा - आता एकदा टेम्पल गार्डन तूर्त जुजबी दुरुस्ती करून ' आहे त्या स्थितीत ' लोकांसाठी खुले करून द्या.दुरुस्त्या होत राहतील यथावकाश !लहान मुले,माता भगिनी,ज्येष्ठ नागरिक येतील तिथे.थोडेफार भेळ,आईसक्रीम,आकाशपाळणे,अशांना सशुल्क परवानगी द्या.असो !

श्रीमान अनिलजी केंदले साहेब ! आपला १५० दिवसाचा आलेख चांगला आहे.असेच निर्णय घ्या.असेच निर्भिड,निर्मोही,निरपेक्ष आणी निडर रहा ! आपल्या अशा प्रत्येक कार्यात वाशिमकर आपल्या सोबत आहेत.

आपल्या तंदुरुस्त १५० दिवसांबद्दल आपले अभिनंदन !

**मी साक्षी भावाने त्यांचे अवलोकन करीत आहे.त्यांचा कामाचा झपाटा आणी सपाटा पाहता**

१)त्यांच्यावर कोणाचा दबाव येवू शकत नाही
२)त्यांच्यावर जबरदस्ती कोणी करू शकत नाही
३)कोणी व्यक्तीगत स्वार्थासाठी वाशीमला वेठीस धरत असेल तर कठोर भूमिका घेतात.
४)जे जनहिताचे आणी जनमताचे तेच ते करतात.
५)दिसायला मृदुनी कुसुमादपी वाटणारे केंदले साहेब वज्रादपी कठोरानी देखिल होऊ शकतात याचा प्रत्यय वाशिमकरांना येतांना दिसतो.

....................

**केंदले साहेब ! आपल्या समन्वय कौशल्याचेही कौतुक.असो.**

**लोकमताचा धांडोळा घेतला तर**

१)यंदाच्या उन्हाळयात नळाचे पाणी नियोजन उत्तम होते.
२)ज्या रस्त्यांसाठी ओरड होती ते रस्ते सुरू झालेत.
३)नाले,नाल्या सफाई,कचरा व्यवस्थापन समाधानकारक आहे.
४)नगराध्यक्ष दस्तूरखुद्द उन्हातान्हाची पर्वा न करता रस्त्यावर उतरून आढावा घेतांना दिसताहेत.
४)लोकभावनांचा आदर होतोय.
५) मुख्य म्हणजे नगराध्यक्ष कोणत्याच चांडाळचौकडीत अडकलेले दिसत नाहीत.माझ्या दृष्टीने श्री.अनिल केंदले यांना याबद्दल शाबासकी !

विद्यावाचस्पती

प्रा.दिलीप जोशी
वाशिम
मो. ९८२२२६२७३५

## दिन विशेष

# चतुरस्त्र अभिनयाने प्रेक्षकांना मोहिनी घालणारी अभिनेत्री नुतन



आज जयंती

नूतन (माहेरचे आडनाव समर्थ/सेन, सासरचे बेहल) यांचा जन्म ४ जून १९३६ रोजी झाला. त्या प्रामुख्याने हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या एक भारतीय चित्रपट अभिनेत्री होत्या. सुमारे चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी ८० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. ज्यात रोमान्सपासून सामाजिक-वास्तववादी नाट्य चित्रपटांपर्यंतचे प्रकार आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नूतनला अनेकदा अपारंपरिक समजल्या जाणाऱ्या संघर्षग्रस्त स्त्रियांच्या पात्रांमध्ये तिच्या नैसर्गिक अभिनय शैलीसाठी ओळख मिळाली होती. तिच्या पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीसाठी विक्रमी पाच फिल्मफेअर पुरस्कारांचा समावेश आहे. १९७४ मध्ये नूतन यांना पद्मश्री हा भारताचा चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार मिळाला.

चित्रपट निर्माते कुमारसेन समर्थ आणि चित्रपट अभिनेत्री शोभना समर्थ यांच्या पोटी मुंबईत जन्मलेल्या नूतनने वयाच्या १४ व्या वर्षी तिच्या आईने दिग्दर्शित हमारी बेटी या चित्रपटातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर तिने नगीना (१९५१) आणि हम लोग (१९५१) चित्रपटांमध्ये काम केले. सीमा (१९५५) मधील तिच्या भूमिकेने तिला व्यापक मान्यता मिळवून दिली आणि तिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पहिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. ती १९६० च्या दशकात व १९७० च्या दशकाच्या उत्तरार्धापर्यंत प्रमुख भूमिका बजावत राहिली आणि सुजाता (१९५९), बंदिनी (१९६३), मिलन (१९६७) आणि मैं तुलसी तेरे आंगन की (१९७८) मधील भूमिकांसाठी तिने इतर चार प्रसंगी फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. या काळातील तिच्या इतर काही चित्रपटांमध्ये अनाडी (१९५९), छलिया (१९६०), तेरे घर के सामने (१९६३), खानदान (१९६५), सरस्वतीचंद्र (१९६८), अनुराग (१९७२) आणि सौदागर (१९७३) यांचा समावेश होतो.

१९८० च्या दशकात, नूतनने व्यक्तिरेखात्मक पात्र साकारण्यास सुरुवात केली आणि तिच्या मृत्यूच्या काही काळापूर्वीपर्यंत ती काम करत राहिली. साजन की सहेली (१९८१), मेरी जंग (१९८५) आणि नाम (१९८६) यांसारख्या चित्रपटांमध्ये तिने मुख्यतः आईच्या भूमिका साकारल्या. मेरी जंग मधील तिच्या अभिनयामुळे तिला सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री श्रेणीत सहावा आणि अंतिम फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. नूतन यांनी नौदल लेफ्टनंट-कमांडर रजनीश बहल यांच्याशी १९५९ मध्ये विवाह केला होता. १९९१ मध्ये स्तनाच्या कर्करोगाने तिचा मृत्यू झाला. त्यांचा एकुलता एक मुलगा मोहनीश बहल हा अभिनेता आहे.

१९४५ मध्ये तिच्या वडिलांच्या नल दमयंती या चित्रपटात नूतन पहिल्यांदा लहानपणी कॅमेऱ्यासमोर दिसली. वयाच्या १४ व्या वर्षी तिची आई दिग्दर्शित हमारी बेटी (१९५०) मध्ये नायिकेची भूमिका करून तिच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर रवींद्र दवे यांचा सस्पेन्स थ्रिलर चित्रपट नगीना (१९५१) आला आणि या चित्रपटातील नूतनच्या अभिनयाने तिला अधिक ओळख मिळाली. हा चित्रपट तिचा पहिला व्यावसायिक यश ठरला. त्याच वर्षी प्रदर्शित झालेला सामाजिक नाट्य चित्रपट हम लोग होता ज्यामुळे प्रेक्षकांमध्ये ती लोकप्रिय झाली. नगीना आणि हम लोग यांनी एक उगवता तारा म्हणून तिचे स्थान मजबूत केले.

# भारतातील एकमेव महिला विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी




श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (एसएनडीटी विद्यापीठ) हे भारतातील एक महिला विद्यापीठ आहे. याची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी केली. हे भारतातील पहिले महिला विद्यापीठ आहे. एसएनडीटीची स्थापना पुण्यातली असली तरी त्याचे स्थलांतर मुंबईस होऊन तिथेच खऱ्या विस्ताराला सुरुवात झाली. या विद्यापीठाशी संबंधित सगळी महाविद्यालये एसएनडीटी कॉलेज म्हणून ओळखली जाऊ लागली.

डिसेंबर, इ.स. १९१५ साली धोंडो केशव कर्वे यांनी इंडियन सोशल काँग्रेसच्या (भारतीय सामाजिक परिषद) अध्यक्षीय भाषणातून महिला विद्यापीठाची कल्पना सर्वप्रथम मांडली. ३ जून, इ.स. १९१६ रोजी विद्यापीठाची औपचारिक स्थापना झाली. पाच विद्यार्थिनींचा पहिला वर्ग ५ जुलै, इ.स. १९१६ रोजी सुरू होऊन विद्यापीठाच्या कामाला आरंभ झाला. इ.स. १९१६ साली या विद्यापीठाची स्थापना भारतवर्षीय महिला विद्यापीठ (इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटी) या नावाने झाली. सर विठ्ठलदास ठाकरसींनी या विद्यापीठाला १५ लाख रुपयांची देणगी दिल्यानंतर विद्यापीठाला त्यांच्या आईचे नाव देण्यात आले. १९२० साली विद्यापीठाचे नाव 'श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे झाले. विद्यापीठातर्फे सुरुवातीला जी.ए. (गृहीतागमा) आणि पी.ए. (प्रदेयागमा) अशा दोन पदव्या दिल्या जात असत. इ.स. १९५१ साली या विद्यापीठाला महाराष्ट्र सरकारची मान्यता मिळाली. इ.स. १९९४ च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात एक वेगळे कलम (क्रमांक १०५) केवळ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी आहे. या विद्यापीठास महाराष्ट्रात तसेच इतर कोणत्याही राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात महाविद्यालये संलग्नित करता येतात. इ.स. १९५२ ते १९५७ या कालावधीत दिवाणबहादुर झवेरी यांनी कुलगुरुपद सांभाळले व यानंतर मात्र एक तप (१९५७ ते १९६९) लेडी ठाकरसींनी. या शेवटच्या बारा वर्षांत १३ नवीन विभागांची/महाविद्यालयांची स्थापना झाली. यात मराठी, चित्रकला हे विभाग मुंबई व पुणे येथे, तसेच नर्सिंग महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गृहविज्ञान महाविद्यालय ही महत्त्वाची महाविद्यालये होती. अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, ग्रंथपालनशास्त्र, फूड सायन्स अँड न्युट्रिशन अशा पदव्युत्तर विभागांचा समावेशही होता. १९७१ ते १९७५ या काळात आणखी ११ विभागांची भर पडली आणि शिवाय पुण्यात एक शिक्षणशास्त्र महाविद्यालय ही स्थापन झाले. भारतातील विद्यापीठात अन्यत्र न दिसणारे महिला विद्यापीठाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अनेक विभाग आहेत. दोन शिक्षणशास्त्र विभाग, स्पेशल एज्युकेशन, शैक्षणिक तंत्रविज्ञान, मार्गदर्शन आणि समुपदेशन, शैक्षणिक व्यवस्थापन, भाषा अध्यापन, तसेच विद्यापीठ संचालित दोन शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुद्धा आहेत.

**कर्वेंनी दूरसि शिक्षणाचा केला होता विचार**

कर्वे यांनी दूरस्थ शिक्षणाचा हा विचार विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच केला होता. सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या मातोश्री दिवंगत कमलाताई काकोडकर आणि अशा अनेक स्त्रियांनी स्वतःचे घर, संसार, नोकरी, उद्योग सांभाळून दूरस्थ शिक्षण पद्धतीने उच्च शिक्षण घेतले. एम.कॉम. हा ८० क्रेडिटचा अभ्यासक्रम पूर्णतः ऑनलाइन प्रणालीने शिकवला जातो. आता ऑगस्ट २०१५ पासून एम.ए. इन एज्युकेशन हा अभ्यासक्रमही पूर्णतः ऑनलाइन करण्यात आला होता.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. ४ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# गुटख्याची विक्री, वाहतूक करणाऱ्या सोबतच आता कंपनी मालकावर होईल कारवाई

प्रतिनिधी ४ जून

**♦ अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांचे निर्देश**



**अकोला :** राज्यात गुटखा बंदी असताना सुद्धा सर्रासपणे सर्वत्र गुटखा मिळतो गुटख्यावर कारवाईचे आदेश आदेश असल्यावरही गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून परराज्यातून गुटखा आणून जिल्ह्यात विक्री केली जात आहे. परंतु आता अवैध गुटखा विक्रेत्यांच्या मुस्क्या आवडण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी धडाकेबाज निर्णय घेतला आहे गुटक्यावर कारवाई करताना थेट कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करून त्यांना आरोपी करा असे स्पष्ट आदेश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिले असल्याची माहिती आहे यापूर्वी केवळ गुटख्याची वाहतूक तसेच विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई होत होती मात्र आता गुटखा कंपनीच्या मालकावर कारवाई केली जाणार आहे अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुंडे यांनी राज्यात धडाकेबाज कारवाया सुरू केल्या आहेत आता राज्यातील गुटखा व पान मसाल्यावर कारवाई करण्याचा त्यांनी आदेश दिला आहे त्यांच्या आदेशानुसार राज्यात ठीक ठिकाणी छापे टाकून गुटखा जप्त करण्यात येत आहे राज्यात गुटखा विक्रीस बंदी आहे असे असताना कर्नाटक गुजरात तसेच मध्यप्रदेशातून गुटका महाराष्ट्रात विक्रीसाठी आणला जातो बुटक्याची वाहतूक करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात येतात मात्र मूळ मालकांवर कारवाई होत नाही कारवाईदरम्यान जप्त केलेल्या गुटक्यावर कंपनीचे नाव व पत्ता ही असतो परंतु त्या दिशेने तपास होत नाही फक्त वाहतूक करणाऱ्यांवरच कारवाई होते आता थेट गुटक्याच्या कंपनी मालकाविरोधात गुन्हे दाखल करण्यात येणार असून गुटकाबंदीची कड़क अंमलबजावणी केली जाणार आहे शहरात तसेच जिल्ह्यात अनेकदा पोलिसांनी छापा टाकत गुटखयाचा माल पकडला आहे. विक्री करणाऱ्यांना तसेच वाहतूक करणाऱ्यांना अटक सुद्धा करण्यात आली आहे मात्र हा गुटखा कुठून आला कोणत्या कंपनीत तयार झाला याचा शोध घेण्याची तसदी पोलिसांनी घेतली नाही यापुढे गुन्हा दाखल करताना कंपनीच्या नावाचा उल्लेख केला जाणार असून कंपनी मालकांना आरोपी केले जाणार आहे.

### अकोला शहरात गुटख्याची मोठ्या प्रमाणात विक्री

अकोला शहरात तसेच जिल्ह्यातही गुटख्याची सर्रास विक्री होत आहे विविध कंपन्यांचा गुटखा सर्वत्र उपलब्ध आहे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विकत्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत मात्र शहरातील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी ढिम्म भूमिका घेतली आहे. गुटखा तर सोडा साध्या फळ विक्रेत्यांवर सुद्धा कारवाई केली जात नाही. अन्न व औषध विभागाच्या आयुक्तांनी आदेश दिल्यानंतरही शहरात गुटख्याची विक्री थांबलेली नाही गुटखा विक्री करणाऱ्या टोळ्या जिल्ह्यात सक्रिय असून पर राज्यातून गुटखा आणून ग्रामीण भागात तसेच शहरात विक्री केली जात आहे

# कृषी विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

**♦ ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द, ३ निलंबित**

**अकोला :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कृषि निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मोठी कार्यवाही केली असून तपासणी आणि सुनावणीअंती ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, ३ केंद्रांचे परवाने १ ते २ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले आहेत. तर इतर ६ केंद्रांना त्रुटीं बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

**या कृषी केंद्रांवर झाली कठोर कारवाई**

तपासणी व सुनावणी दरम्यान समाधानकारक खुलासा, स्पष्टीकरण न देऊ शकल्याने अकोट तालुक्यातील बोर्डी येथील राय कृषी सेवा केंद्र, अकोली जहाँगीर येथील मोहन ट्रेडर्स, तेल्हारा तालुक्यातील तळेगाव बु. येथील महालक्ष्मी कृषी सेवा केंद्र, पातूर तालुक्यातील सस्ती येथील शिवशक्ती ?ग्रोटेक, पातूर येथील खानापूर रस्त्यावरील शेतकरी कृषी सेवा केंद्र, वाडेगाव येथील बळीराजा कृषी सेवा केंद्र आणि बादलापूर येथील जगदंब ॲग्रो एजन्सीज व ॲग्रोटेक या सात केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे, बाळापूर तालुक्यातील निंबा फाटा येथील आपलं ग्रोमर कृषी सेवा केंद्र यांचे एका महिन्यासाठी, तेल्हारा तालुक्यातील वारखेड येथील शेतकरीपुत्र कृषी सेवा केंद्राचे दोन महिन्यासाठी व कापशी रोड येथील मातोश्री कृषी सेवा केंद्राचे एका महिन्यासाठी परवाना निलंबन करण्यात आले आहे.

कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषि अधिकारी कार्यालय व कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या मोहिमेत एकूण १६ कृषी केंद्रांमध्ये गंभीर व नियमबाह्य बाबी आढळून आल्या. 'इ-पॉस' (I-इदए) मशीनमधील अधिकृत साठा आणि प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध असलेला साठा यात मोठी तफावत आढळली. दुकानात साठा फलक आणि चालू दर फलक अद्ययावत ठेवले नव्हते. तसेच, शेतकऱ्यांना अधिकृत 'पक्की बिले' न देणे किंवा दिलेली बिले विहित नमुन्यात नसणे, केंद्राचे अधिकृत परवाना/नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे या त्रुटींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीत उचित खुलासा उत्तर न मिळाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली. कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी. खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून विहित नमुन्यातील पक्के बिल आवर्जून मागावे. बिलावर लॉट नंबर, बॅच नंबर आणि योग्य किंमत लिहिलेली आहे का, याची शहानिशा करा. नेहमी नामांकित आणि नोंदणीकृत कंपन्यांच्याच कृषी निविष्ठांना प्राधान्य द्यावे.

**तक्रार कोठे करावी?**

◆ जर कोणत्याही कृषी केंद्रचालकाने बियाणे किंवा खतांचा काळाबाजार केला, जादा दराने विक्री केली किंवा पक्के बिल देण्यास नकार दिला, तर शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या तालुक्यातील पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील 'तक्रार निवारण कक्षात' संपर्क साधावा, लेखी तक्रार करावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव जवळ संजय ट्रॅव्हल्सची ट्रकला धडक, 15 प्रवासी जखमी

प्रतिनिधी ४ जून



**वाशिम :** वाशिमच्या समृद्धी महामार्गावर शेलू बाजार ते मालेगाव दरम्यान आज पहाटे एका लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील ट्रकला धडक दिल्यामुळे भीषण अपघात झाल्याची घटना घडली.या अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चार जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.वाशीम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावरून संजय ट्रॅव्हल्स कंपनीची बस नागपूरहून पुण्याकडे जात होती.दरम्यान आज पहाटे २ ते ३ च्या सुमारास मालेगाव ते शेलुबाजार जवळ असलेल्या कवरदरी येथे या लक्झरी ट्रॅव्हल्सने समोरील एका ट्रकला जोरदार धडक दिली.या भिषण अपघातात ट्रॅव्हल्स मधील १५ प्रवासी जखमी झाले असून चालक आणि क्लिनरसह दोन प्रशांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, बचाव पथक व आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले.जखमींना तातडीने वाशीम आणि अकोला येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या उपचार सुरू आहे.चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# वादळ वाऱ्यामुळे केळी उत्पादकांचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

**♦ शासनाकडे मदतीची मागणी**



**बाळापूर :** अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले. १ जून रोजी संध्याकाळी वादळी वारा केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणारा ठरला. पीक काही दिवसातच काढणीला येणार होते.

पण वादळ वाऱ्याचा केळीच्या संपूर्ण पिकाला जबरदस्त फटका बसला. यामुळे बाळापुर तालुक्यासह जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकरी हा निसर्गाच्या या लहरीपणाला बळी पडला आहे. शासनाने काही प्रमाणात बुडत्याला काठीचा आधार याप्रमाणे लवकरात लवकर मदत जाहीर करावी व या अडचणीच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे हीच आशा केळी उत्पादक शेतकरी मनाशी बाळगून आहेत. एक निवेदन बाळापुर तालुक्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी तहसीलदार वैभव फरताळे यांना देण्यात आले. जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना या पिकासाठी पिक विमा लागू करून शासकीय संरक्षण मिळावे अशी अपेक्षा केली.

# शासकीय कार्यालयातील वॉटर कुलर रिकामे

प्रतिनिधी ४ जून

**♦ महिला व बालकल्याण विभागातील प्रकार**

**अकोला :** शहरातील संतोषी माता मंदिर जवळील महिला व बाल कल्याण विभाग कार्यालयात पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांना पाण्याच्या शोधात वनवन भटकावे लागत आहे. महिला व बालकल्याण दोन वॉटर कुलर बसविण्यात आले, परंतु दोन्ही वॉटर कुलर मध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे या कार्यालयात येणारे नागरिक चांगलेच वैतागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून महिला व बालकल्याण विभाग कार्यालयात लाडकी बहीण योजनेच्या कामासाठी महिला आपल्या मुलांसह कार्यालयात तासंतास बसून राहतात, या ठिकाणी येणाऱ्या महिलांना पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याने त्यांना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे या कार्यालयात कामकाज करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी पाण्याची कॅन ची व्यवस्था करण्यात आली आहे, तर दुसरीकडे कामकाजाकरता येणारे नागरिक तसेच तहानलेले दिसून येत आहेत. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याबातच्या व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता या कार्यालयातील पाणीपुरवठा करणारी सबमर्सिबल बोअर काम करीत नसल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून कार्यालयाकडून नागरिकांकरता पाण्याची त्यांची व्यवस्था करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

# पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम नाही !

**♦ संतप्त रोहणखेडा-पर्वतापूर ग्रामस्थांनी धरणाचे काम पाडले बंद**

प्रतिनिधी ४ जून

**अमरावती :** पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर सुटला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. 'आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम' अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. २ जून रोजी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांना निवेदन देऊनही प्रशासनाने कोणतीही सकारात्मक भूमिका न घेतल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. धरणासाठी जमीन दिल्यानंतर शेती, रोजगार आणिउदरनिर्वाहाची साधने हिरावली गेली असून अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'प्रशासनाला धरणाचे काम महत्त्वाचे वाटतेः मात्र ज्यांच्या जमिनी गेल्या त्या विस्थापितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दुर्लक्षित केला जात आहे.

# आमदार हरीश पिंपळे यांनी लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाची केली पाहणी

प्रतिनिधी ४ जून



**मुर्तिजापूर :** श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाला आमदार हरीश पिंपळे यांनी भेट देऊन विविध विभागांची सविस्तर पाहणी केली. रुग्णालयातील आरोग्य सेवा, स्वच्छता व रुग्णांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. यावेळी आमदार पिंपळे यांनी एक्स-रे विभाग, ईसीजी विभाग, लसीकरण कक्ष, रुग्ण वॉर्ड तसेच स्वयंपाकगृहाची पाहणी करून रुग्णांना मिळणाऱ्या सेवांची माहिती घेतली. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रत्येक नागरिकाला सरकारी रुग्णालयात दर्जेदार उपचार, आवश्यक औषधे आणि उत्तम आरोग्य सुविधा वेळेवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालय परिसरातील स्वच्छता आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर भर देण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

या पाहणी दरम्यान नगराध्यक्ष हर्षल साबळे, भाजप तालुकाध्यक्ष नंदकिशोर राऊत, रुग्णसेवक सुनीलभाऊ लछुवाणी, नगरसेवक लखन मिलांदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राजेंद्र नेमाडे तसेच रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.

रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास आमदार हरीश पिंपळे यांनी यावेळी व्यक्त केला.


# खामगावात चोरी; रोकड लंपास !

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शहरातील शिवाजीनगर परिसरात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करत, तब्बल ५ लाख २० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. शिवाजीनगर जुना फैल परिसरात राहणारे योगेश प्रभाकर केवारे (वय ४०) हे संगणक जॉबवर्कचा व्यवसाय करतात. १ जून रोजी सकाळी ११ वाजेपासून सायंकाळी ७ वाजेपर्यंत त्यांच्या घरात कोणी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर उघडून त्यामध्ये ठेवलेली ५ लाख २० हजार रुपयांची रोकड घेऊन पोबारा केला. सायंकाळी घरी परतल्यानंतर ही चोरी उघडकीस आली. घटनेची खात्री झाल्यानंतर योगेश केवारे यांनी २ जून रोजी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# प्रेमसंबंधाचे रूपांतर मारहाणीत!

## नगरसेवकाचा महिलेवर संशय, भररस्त्यात चप्पलांनी हल्ला



**यवतमाळ :** प्रेमसंबंधातून सुरू झालेला वाद अखेर मारहाणीपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना घुग्घुस येथे उघडकीस आली आहे. नगर परिषदेचे अपक्ष नगरसेवक पंकज धोटे यांनी एका महिलेला भररस्त्यात हाताबुक्क्यांनी व पायातील जोड्याने मारहाण केल्याचा आरोप असून, या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. ४ जून) सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास लॉयड्स मेटल्स कंपनीच्या प्रवेशद्वाराजवळ संबंधित महिला उभी होती.

यावेळी नगरसेवक पंकज धोटे तेथे पोहोचले आणि 'तू कोणाशी बोलतेस?' असा जाब विचारत संतापाच्या भरात महिलेवर तुटून पडले.

**दोन वर्षांचे प्रेमसंबंध; संशयातून वादाची ठिणगी**

सूत्रांच्या माहितीनुसार, मागील दोन वर्षांपासून नगरसेवक पंकज धोटे आणि संबंधित महिलेमध्ये प्रेमसंबंध होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून नगरसेवक महिलेवर संशय घेत होते. याच कारणावरून वारंवार शिवीगाळ आणि वाद होत असल मारहाणीपर्यंत पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेत असल्याने संताप सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीकडूनच महिलेवर मारहाण झाल्याचा आरोप समोर आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# अकोला शहरात अतिक्रमणविरोधात महापालिकेची धडक कारवाई

प्रतिनिधी ४ जून

**बसस्थानक, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर परिसरातील अतिक्रमणे हटवली**
**विदर्भ हॉस्पिटलसमोरील रस्ते मोकळे नागरिकांनी व्यक्त केले समाधान**




**अकोला :** अकोला शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या समस्येवर अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर तसेच विदर्भ हॉस्पिटलसमोरील मुख्य रस्त्यावर करण्यात आलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक अनधिकृत बांधकामे, हातगाड्या आणि रस्त्यावरील अडथळे हटविण्यात आले. या कारवाईमुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण दूर झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

अकोला शहरातील प्रमुख रस्ते आणि व्यापारी भागांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत होती. याची दखल घेत प्रशासनाने विशेष अतिक्रमण हटाव मोहीम राबवत बसस्थानक परिसर, रतनलाल प्लॉट, जवाहर नगर आणि विदर्भ हॉस्पिटलसमोरील भागात धडक कारवाई केली. या कारवाईदरम्यान रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत हातगाड्या, फेरीवाले, तात्पुरती शेड्स तसेच इतर अतिक्रमणे हटविण्यात आली. प्रशासनाच्या पथकाने संबंधितांना पूर्वसूचना देत नियमानुसार कारवाई केल्याची माहिती मिळाली आहे. अतिक्रमणामुळे नागरिकांना तसेच रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विदर्भ हॉस्पिटल परिसरात रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना वाहतुकीच्या समस्येमुळे त्रास सहन करावा लागत होता.या कारवाईनंतर संबंधित भागातील रस्ते मोकळे झाले असून वाहतुकीला दिलासा मिळाला आहे. अतिक्रमण पुन्हा होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित पाहणी करून आवश्यक ती कारवाई सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शहरातील रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे आणि सार्वजनिक जागांवर अनधिकृत अतिक्रमण टाळावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाघ शिकार प्रकरणातील महिलेचा जामीन अर्ज फेटाळला

वि प्रतिनिधी ४ जून

**अकोट:** मेळघाट-अकोट वन्यजीव विभागाच्या हद्दीतील वाघ शिकारी प्रकरणातील महिला आरोपी गजेंद्रीबाई ऊर्फ शीतल रतन ऊर्फ टेरालिन पारधी (रा. देवरी, मध्य प्रदेश) हिचा जामीन अर्ज अकोट येथील अतिरिक्त जिल्हा व विशेष सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला. खिरकुंड वनक्षेत्रात ६ ऑगस्ट २०१३ रोजी वाघाची शिकार करून त्याची कातडी व हाडे विकल्याप्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात आरोपीला मध्य प्रदेशातील मंडला कारागृहातून प्रॉडक्शन वॉरंटद्वारे ताब्यात घेण्यात आले होते. सरकार पक्षातर्फे ॲड. अजित देशमुख यांनी युक्तिवाद करताना या प्रकरणातील इतर आरोपींना यापूर्वी शिक्षा झाल्याचे तसेच गजेंद्रीबाई २०१२ पासून फरार असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तिच्याविरुद्ध अन्य वन्यजीव शिकारीचे गुन्हेही दाखल असल्याचा दावा करण्यात आला. यानंतर न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळण्याचा आदेश दिला.

सिटी न्यूज सुपरफास्ट
बुलडाणा
गुरुवार, दि.४ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी- मागणी

**मलकापूर :** बाजारातील सध्याची एम. आर. पी. (कमाल किरकोळ किंमत) व्यवस्था ग्राहकांच्या संरक्षणाऐवजी शोषणाचे माध्यम बनत चालली असून, उत्पादकांकडून मनमानी पध्दतीने जास्त किंमती छापून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. यावर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, शाखा मलकापूरच्या वतीने ३ जून रोजी तहसीलदार यांचे मार्फत केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, एमआरपी व्यवस्थेत सुधारणा करण्यात यावी, ग्राहकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर दुरुस्त्या करण्यात याव्यात, कंपन्यांच्या मनमानी छापण्यावर एमआरपी कायदेशीर बंदी घालण्यात यावी, याकरीता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्यात यावी, प्रत्येक उत्पादनावर एमआरपी सोबतच त्याचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च लिहणे बंधनकारक करण्यात यावे, फसवणूक करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. यासह आदी मागण्या या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत. निवेदन देतेवेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका अध्यक्ष दामोदर शर्मा, हरिभाऊ पाटील सर, के. एस. शर्मा, धर्मेश राजपूत, ॲड. व्यंकटेश पानमवार, पंकज मोरे, भिकु भोजने आदी उपस्थित होते.

# अन्नसुरक्षा योजनेच्या इष्टांकात वाढ; जिल्ह्यात 622 अंत्योदय कार्ड

### ◆ ३७,३०१ प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांची पडली भर

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव:** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सवलतीच्या दरात अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने जिल्हानिहाय इष्टांकात सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणाली वरील अद्ययावत माहितीच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जारी केला आहे. या निर्णयानुसार बुलढाणा शिधापत्रिकांची वाढ करण्यात आली असून, प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थी संख्येत ३७ हजार ३०१ जणांची भर पडली आहे. जिल्ह्यात ६२२ अंत्योदय अन्न योजना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची महाराष्ट्रात



१ फेब्रुवारी २०१४ पासून अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या अधिनियमांतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील ७६.३२ टक्के आणि शहरी भागातील ४५.३४ टक्के लोकसंख्येला सवलतीच्या दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. त्यानुसार राज्यासाठी एकूण ७००.१६ लाख लाभार्थ्यांचा इष्टांक निश्चित करण्यात आला

**कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश**
शासन निर्णयानुसार, १ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयासोबत जोडलेले विवरणपत्र रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी नव्याने निश्चित करण्यात आलेल्या जिल्हानिहाय इष्टांकाच्या मर्यादेत अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांची निवड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, क्षेत्रीय कार्यालयांनी सुधारित इष्टांकाची पूर्तता करताना कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करावे, शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या असे निर्देशही देण्यात आले आहेत.

असून, त्यामध्ये ग्रामीण भागासाठी ४६९.७१ लाख आणि शहरी भागासाठी २३०.४५ लाख लाभार्थीचा समावेश आहे. यापूर्वी २०१३, २०१५, २०१६ तसेच २०२२ नंतर विविध शासन निर्णयांद्वारे जिल्हानिहाय इष्टांक निश्चित करण्यात आला होता. मात्र, अनेक वेळा इष्टांकात बदल आणि पुनर्निर्धोरण करूनही राज्यासाठी मंजूर लाभार्थी संख्येची पूर्ण पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः शिधापत्रिकांचे संगणकीकरण आणि लाभार्थ्यांच्या डिजिटल नोंदींच्या पडताळणीत अनेक जिल्ह्यांमध्ये इष्टांक अद्याप पूर्ण झाले नसल्याचे आढळून आले. या पार्श्वभूमीवर शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीवर डिजिटायझेशन करण्यात आलेल्या अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांच्या अद्ययावत संख्येच्या आधारे जिल्हानिहाय सुधारित इष्टांक निश्चित करण्यात आले आहे.

**जुलैमध्ये सुधारित इष्टांक देणार!**
राज्यातील शिल्लक इष्टांकाचा नियमित आढावा घेऊन दरवर्षी जानेवारी आणि जुलै महिन्यात इष्टांकाचे पुनर्वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभमिळवून देण्यासाठी अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक व्यवस्था निर्माण होण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.

# भूमिअभिलेख संगणकीकरणातील त्रुटींमुळे हजारो मालमत्ताधारक अडचणीत !

### चिखलीत मालमत्ता व्यवहार ठप्प, नागरिक त्रस्त !

प्रतिनिधी ४ जून

**चिखली:** भूमिअभिलेख विभागाच्या संगणकीकरण प्रक्रियेतील गंभीर त्रुटींमुळे शहरातील हजारो मालमत्ताधारक अडचणीत सापडले आहेत. शहरातील विविध नझूल शीट क्रमांकांची माहिती ऑनलाइन प्रणालीमध्ये चुकीच्या पद्धतीने केवळ नझूल शीट क्रमांक ०१ अंतर्गत नोंदविण्यात आल्याने मूळ अभिलेख आणि डिजिटल नोंदींमध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. या त्रुटीमुळे अनेक मालमत्तांची पीआर कार्डे ऑनलाइन उपलब्ध होत नसल्याने फेरफार, नाव दुरुस्ती आणि इतर महसुली प्रक्रिया रखडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.याबाबत मनसेचे जिल्हाध्यक्ष गणेश बरबडे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. शहरातील सर्व नझूल शीट क्रमांक व प्लॉट क्रमांकांची माहिती मूळ अभिलेखांशी पडताळून त्यांची १५ दिवसांच्या आत दुरुस्ती करा, तसेच शून्य किंवा चुकीचे क्षेत्रफळ दाखविणाऱ्या सर्व 'पीआर कार्ड' त्वरित अद्ययावत करा, ७/१२ प्रमाणेच 'पीआर कार्ड' फेरफार प्रणाली 'आयजीआर' शी प्रभावीपणे जोडा आणि या चुकीस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली असून १५ दिवसांत प्रशासनाने ठोस कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला. प्रवीण देशमुख, संजय दळवी, अंकित इंगळे, विष्णू झाल्टे आदी उपस्थित होते.पीआर कार्डवरील क्षेत्रफळ ऑनलाइन नोंदीत 'शून्य'!

धक्कादायक बाब म्हणजे अनेक मालमत्तांच्या 'पीआर कार्ड'मध्ये प्रत्यक्ष क्षेत्रफळ असतानाही ऑनलाइन नोंदीत ते थेट 'शून्य' दाखविले जात आहे. त्यामुळे मालमत्तांचे कायदेशीर व्यवहार अडचणीत आले असून, खरेदीदार आणि विक्रेत्यांना प्रशासनाच्या चुकीची शिक्षा भोगावी लागत आहे. अनेक आर्थिक व्यवहार अडकले आहेत.

# वन जमिनीतून ५६ ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन!

### भादोला वन बिटमधील धडक कारवाई; तीन आरोपी अटकेत

प्रतिनिधी ४ जून

**बुलढाणा:** गौण खनिजांच्या अवैध उत्खननाचे जाळे आता थेट वनजमिनीपर्यंत पोहोचल्याचे भादोला येथील कारवाईतून समोर आले आहे. बुलढाणा वन परिक्षेत्रातील भादोला वन बिटमध्ये मुरुमाचे बेकायदेशीर उत्खनन करून त्याची वाहतूक केल्याप्रकरणी वन विभागाने मोठी कारवाई करत तीन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत दोन ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी आणि अन्य साहित्य, असा सुमारे १९ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भादोला बिटमधील कक्ष क्रमांक ५२३ मध्ये वनजमिनीतून मुरुमाचे अवैध उत्खनन सुरू असल्याची माहिती वन विभागाला मिळाल्यानंतर विभागीय वन अधिकारी जमीर शेख यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले. सहायक वनसंरक्षक वैभव काकडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपास सुरू केला. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान गावातील नव्याने बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्याच्या साईड पट्ट्यांसाठी वनक्षेत्रातून मुरूम काढण्यात आल्याचे उघड झाले. त्यानंतर आरोपींचा शोध घेऊन महेश भीमराव जाधव (वय ४०), योगेश वसंतराव एकडे (वय ४१, दोघे रा. भादोला) आणि विजय रामा इटकर (वय ३१, रा. पिंपरखेड) यांना अटक करण्यात आली. कारवाईमध्ये यांचा सहभाग कारवाईत वनपाल प्रदीप मुंढे, वनरक्षक नितेश गवई, समाधान झोटे, गजानन शिंदे, गजानन पोटे, विक्रम राऊत, बाळासाहेब घुले तसेच वनमजूर रवींद्र तायडे, दीपक सोनुने, पवन मुळे, अमोल चव्हाण आणि प्रवीण सोनवणे यांनी सहभाग घेतला. वन विभागाच्या चौकशीत वनखंड क्रमांक ५२३ मधून तब्बल ५६ ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# महिनाभरानंतर मृतदेह बाहेर काढून फॉरेन्सिक तपासणी!

### राजुरा येथे शीरविरहित महिलेच्या हत्या प्रकरणात तपासाला वेगः मृत महिलेची ओळख पटविण्याचे आव्हान कायम !

प्रतिनिधी ४ जून

**जळगाव जामोद:** तालुक्यातील राजुरा येथील शीरविरहित महिलेच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून, तपासातील एक महत्त्वाचा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. या प्रकरणात २ मे रोजी जळगाव जामोद येथील स्मशानभूमीत दफन करण्यात आलेला महिलेचा मृतदेह तब्बल महिनाभरानंतर ३ जून रोजी पुन्हा बाहेर काढून त्याची सखोल फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली.

तपासाच्या अनुषंगाने मलकापूर येथील फॉरेन्सिक तज्ज्ञांचे विशेष पथक जळगाव जामोद येथे दाखल झाले होते. दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास 'जेसीबी'च्या साहाय्याने दफन केलेला मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर फॉरेन्सिक तज्ज्ञांनी मृतदेहातील विविध जैविक नमुने, हाडांचे अवशेष तसेच तपासासाठी आवश्यक अन्य पुरावे संकलित केले. या संपूर्ण कारवाईवर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे बारकाईने लक्ष होते.

घटनास्थळी अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक महेश पाटील, पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अप्पर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा, तपास अधिकारी तथा मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे, मलकापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी आनंद महाजन, जळगाव जामोद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन बागुल, तहसीलदार पवन पाटील, राजुरा गावचे पोलिस पाटील तसेच मोठ्या संख्येने पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

फॉरेन्सिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून तपासाच्या पुढील दिशेबाबत चर्चा केली. सुरुवातीपासूनच या प्रकरणातील अनेक प्रश्न अनुत्तरित राहिल्याने पोलिसांकडून प्रत्येक बाब नव्याने पडताळून पाहिली जात आहे. या नव्या घडामोडींमुळे राजुरा परिसरात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले असून, फॉरेन्सिक अहवालातून कोणते नवे धागेदोरे समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.तपासासाठी महत्त्वाचे ठरणारे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येणार असून, त्यातून मृत्यूचे नेमके कारण आणि मृत महिलेची ओळख पटविण्यास मदत होण्याची शक्यता आहे. मृत महिलेची ओळख अद्याप निश्चित झालेली नसल्याने पोलिसांसमोर सर्वात मोठे आव्हान कायम आहे. महिलेबाबत अथवा तिच्या ओळखीबाबत खात्रीशीर माहिती देणाऱ्या व्यक्तीस ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# संग्रामपूर तालुक्याला वादळाचा फटका; ४४३७ हे. शेती बाधीत, संत्रा, केळी पिकाचे नुकसान

प्रतिनिधी ४ जून

**सोनाळा :** सोमवार १ जून संद्याकाळी तासभर च्या तालुक्यात सातपुडा व पायथ्याशी चक्रीवादळाने मोठा तडाखा दिला उपरोक्त मान्सून पूर्व वादळी वाऱ्यासह पावसाने संग्रामपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची भिषण त्रेधाटिपट उडविली. या वादळाच्या कोहराम मध्ये संत्रा व केळी जमिन दोस्त झाली आहे. ७४ गावातील ४६५६ शेतकऱ्यांचे ४४३७. ६ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. यात २५३७ शेतकऱ्यांचे २२८३ हेक्टर संत्रा पिकाचे नुकसान झाले. २०८३ शेतकऱ्यांच्या २१२३ हेक्टर क्षेत्रावरील केळी पिक मातीत गेले. लिंबू च्या ३२ शेतकऱ्यांचे २८ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले. आंबा १ शेतकरी १ हेक्टर, पपई २ शेतकरी व त्याचे क्षेत्र २..६ हेक्टर आहे. असा प्राथमिक अहवाल संग्रामपूर तालुका प्रशासनाने ३ जून रोजी तातडीने जिल्हा प्रशासनाला सादर केला आहे. तत्पूर्वी २ जून ला जळगाव जामोद एसडीओ शैलेश काळे यांनी अनेक शेतात जावून पिक नुकसानी चा प्रत्यक्ष आढावा घेतला. तदनंतर

संग्रामपूर तहसिलदार प्रशांत पाटील, तालुका कृषी अधिकारी



जाधव यांनी बांधावर जात शेत जमीन नुकसान बधीतले. त्यानंतर तहसिलदार बीडीओ व तालुका कृषी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने जिल्हा प्रशासनाला प्राथमिक अहवाल सादर केला आहे. केवळ एका तासात झालेल्या

निसर्ग तांडवाने शेतीचे न भरून नुकसान झाले आहे.

संग्रामपूर हा शेती बहुल तालुका आहे. या तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र ५००२० हेक्टर आहे तर वहिती खाली क्षेत्र ४३८२१ हेक्टर एवढे आहे.

तालुक्यात ५ महसुली मंडळ आहेत या तील बहुतांश मंडळातील ७४ गावात वादळाने तांडव करित शेतकऱ्यांची दाणादाण केली गेल्या ४ वर्षापासून अस्मानी संकटामुळे बळीराजाचे अर्थचक्र चिखलात रुतले आहे. अस्मानी व सुलतानी संकटाने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शेतीत वादळी वारे, दरवर्षीची अतिवृष्ठी यामुळे शेतकरी रडकुंडी ला आला आहे. आता तर खरिप हंगाम डोक्यावर आहे एकीकडे कर्जमाफी तुर्त झाली नाही त्यामुळे बँकांची कवाडे शेतकऱ्यांना बंद आहेत. अशा स्थितीत शासनाने तातडीची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आहे.

# अखेर एलसीबी पीएसआयसह ४ पोलीस निलंबित

प्रतिनिधी ४ जून

**खामगाव :** शिर विरहीत तरुणीच्या खून प्रकारणातील तपासाच्या भोंगळपणाची किंमत अखेर स्थानिक गुन्हे शाखेला चुकवावी लागली आहे. कारण तपास पथकातील पी. एस.आय. यांचेसह चार पोलीस कर्मचाऱ्यांना अखेर जिल्हा पोलीस अधिक्षक तांबे यांनी निलंबित केले आहे.

जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा शिवारात २५ एप्रिल रोजी शिर विरहित तरुणीचे प्रेत आढळून आले होते. हे प्रेत मध्यप्रदेशातील शिवानी

कळमेकर हिचे असल्याचा शोध या तपास अधिकाऱ्यांनी लावला होता व तिच्या खुनाच्या आरोपात चक्क तिचे वडीलव भावाला अटक केली होती. परंतु ही तरुणी २८ मे रोजी जळगाव जामोद पोस्टेला हजर झाली. त्यामुळे या खुनाच्या तपासातील भोंगळपणाची चर्चा होऊ लागली. याप्रकरणी स्थागुशाखेचे पीएसआय पंकज सपकाळे, पोलीस अमलदार अजित रहेमान परशुवाले, एजाज रफिक खान आणि अमोल शेजोळे यांना प्रथम नियंत्रण कक्षामध्ये जमा करण्यात आले होते. परंतु पोलिसांची ही गंभीर चूक पाहता बदलीचीही छोटी कारवाई होती. दरम्यान पोलीस प्रशासनाच्या या तपासाची धिंडवडे सर्वत्र उडत असतांनाच २ जून रोजी पोलीस अधिक्षक तांबे यांनी उपरोक्त पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह चारही पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

# विजेचे खांब, रोहित्रांवरील बेकायदेशीर जाहिरातबाजी थांबविण्याचे निर्देश

प्रतिनिधी ४ जून

**नांदुरा :** शहरातील महावितरणच्या विद्युत खांबांवर व रोहित्रांवर (डीपी) विनापरवानगी जाहिरात फलक लावण्याच्या प्रकाराबाबत अखेर महावितरण प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणच्या नांदुरा शहर शाखेचे सहाय्यक अभियंता यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून अशा अनधिकृत जाहिरातबाजीवर तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे.

महावितरणने पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे की, शहरातील विविध चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच महावितरणच्या अखत्यारितील विद्युत खांब व रोहित्रांवर मोठ्या प्रमाणात विनापरवानगी जाहिरात फलक लावले जात आहेत. यामुळे विद्युत यंत्रणांच्या सुरक्षिततेला बाधा निर्माण होण्याबरोबरच देखभाल व दुरुस्तीची कामे करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवितासही धोका निर्माण होऊ शकतो.

तसेच जाहिरात फलक लावताना किंवा काढताना विद्युत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, विविध संस्था व नागरिकांनी विद्युत खांब व रोहित्रांवर कोणत्याही प्रकारचे अनधिकृत फलक लावू नयेत, याबाबत नगर परिषदेमार्फत सूचना देण्याची विनंती करण्यात आली आहे.

या पत्राची प्रत पोलीस स्टेशन नांदुरा, विद्युत निरीक्षक कार्यालय खामगाव, कार्यकारी अभियंता मलकापूर तसेच उपकार्यकारी अभियंता नांदुरा यांनाही पाठविण्यात आली आहे. महावितरणने घेतलेली ही दखल महत्त्वाची मानली जात असून, यामुळे भविष्यात अशा प्रकारांना आळा बसणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# शासकीय वसतिगृहात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी ४ जून

**मेहकर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, मेहकर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

प्रवर्गनिहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील शालेय (इयत्ता ८ वी वरील), कनिष्ठ महाविद्यालयीन तसेच व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी प्रवेशासाठी अर्ज करू शकतात. वसतिगृहात सर्व सोयी-सुविधा मोफत उपलब्ध असून प्रवेशासाठी विद्यार्थिनींनी गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, वयाचा पुरावा, जात प्रमाणपत्र, शाळा किंवा महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, आधार कार्ड, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आदी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी httped://hmas.mahait .org या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करावा. तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह, मेहकर येथे संपर्क साधावा, असे आवाहन वसतिगृह प्रशासनाने केले आहे.

# सिं. राजात उद्या पंडित दीनदयाल उपाध्यक्ष रोजगार मेळावा

प्रतिनिधी ४ जून

**बुलढाणा :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि राजमाता पॅरामेडिकल कॉलेज, सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा ५ जून रोजी सकाळी ९. ३० वाजता राजमाता पॅरामेडिकल कॉलेज, मेहकर रोड, सिंदखेडराजा येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात क्विझ कॉर्पोरेशन, नागपूर यांच्या माध्यमातून महानगर गॅस लिमिटेड, मुंबई आणि टाटा मोटर्स, पुणे या नामांकित कंपन्यांनी विविध रिक्त पदांसाठी उमेदवारांची भरती प्रक्रिया राबविणार आहेत. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय, पदवीधर तसेच एऊझिं अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेले पुरुष व महिला उमेदवार सहभागी होऊ शकतात. इच्छुकांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांसह ५ जून रोजी सकाळी ९. ३० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहून नोंदणी करावी जिल्ह्यातील पात्र, गरजू व रोजगार इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक (०७२६२) २४२३४२ वर संपर्क साधावा.

# आयुष्मान भारत व आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन

### नगराध्यक्ष तायडे यांचे नागरिकांना लाभघेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ४ जून

**सिंदखेडराजा :** शहरातील सर्व नागरिकांना आरोग्याविषयी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने स्थानिक नगर परिषदेच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१ ते १५ जून या कालावधीत संपूर्ण सिं. राजा शहर हद्दीत 'आयुष्मान भारत कार्ड, आभा कार्ड नोंदणी तसेच वय वंदना कार्ड' काढण्यासाठी प्रभाग निहाय शिबिरे हा उपक्रम राबविण्यात येत आहेत.

मुख्याधिकारी, न. प. सिंदखेडराजा यांनी शहरातील सर्व १ ते १० प्रभागांमधील नागरिकांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी नियोजन केले आहे. आरोग्य निरीक्षक व शहर समन्वयक यांच्या माध्यमातून हे शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

**५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार**

पात्र लाभार्थ्यांना गंभीर आजारांवर वर्षभरात ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार मिळतील. हे कार्ड देशातील कोणत्याही अंगीकृत रुग्णालयात उपचारासाठी वैध असेल. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर उपचाराचा खर्च थेट शासनामार्फत केला जाईल. डिजिटल आरोग्य रेकॉर्ड (आभा आयडी) नागरिकांचे आरोग्य रेकॉर्ड डिजिटल स्वरूपात सुरक्षित राहील.

वय वंदना कार्ड: ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष वय वंदना कार्डही या शिबिरात काढता येणार आहे.

**शिबिराची वेळ व ठिकाण :** कालावधी : १ ते १५ जून दरम्यान सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शहरातील संबंधित प्रभागांम शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराचा लाभघेण्यासाठी नागरिकांनी सोबत आधारकार्ड, रेशनकार्ड आणि मोबाईल क्रमांक घेऊन येणे बंधनकारक आहे.

# लेखी आश्वासनाने साखळी उपोषणाची सांगता

**मेरा बु. :** मनुबाई ते अंढेरा या जोड रस्त्यासाठीष्मनुबाई येथील ग्रामस्थांनी २९ मेपासून रोडवर मंडप टाकून साखळी उपोषण सुरु केले होते. या उपोषणाच्या चौथ्या दिवशी अचानक सायंकाळच्या ८ वाजेच्या दरम्यान वादळी वारे सुटल्याने मंडप हवेत उडू लागला. उपोषण कर्त्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागल्याने उपोषण कर्त्यांची प्रकृती खालावली. या घटनेची बातमी दैनिक देशोन्नतीमध्ये प्रकाशीत झाली. बातमी प्रकाशीत होताच तहसीलदर सवडे, ठाणेदार शक्करगे, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी उपोषणस्थळी भेट देवून लेखी आश्वासनाने साखळी उपोषणाची सांगता करण्यात आली.

या रस्त्याचे खडीकरण यापूर्वी मंजूर झाले होते, तसेच आता यावर्षी मातोश्री पांदन रस्ता योजने अंतर्गत रस्त्याचे खडीकरण मंजूर झाले मात्र रस्त्यावरील काही लोकांनी कामास अडथळा निर्माण करून काम बंद पाडले. त्यामुळे ग्रामस्थांनी २९ मे पासून मनुबाई ते अंढेरा हा जोड रस्त्यासाठी साखळी आमरण उपोषण सुरु केले होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135